Desktop/prashant/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१५–१६/१५

**परिपत्रक :–**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:विनैसु– १५१५/२५४/प्र.क. २५७/२९, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ अन्वये शुक्रवार, दिनांक १९ जून, २०१५, रोजी पावसामुळे मुंबई व मुंबई उपनगरांत रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी वर उल्लेखित कारणामुळे शुक्रवार, दिनांक १९ जून, २०१५ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत अशा अधिकारी/कर्मचा–यांना त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी. राज्य शासनाने सदर रजा राज्य शासकीय/निमशासकीय कार्यालये, संघटना, शासनाचे उपक्रम तसेच राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील कार्यालये यांच्यासाठी लागू केली आहे. त्यानुसार विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांना शुक्रवार, दिनांक १९ जून, २०१५, रोजी पावसामुळे मुंबई व मुंबई उपनगरांत रेल्वे वाहतूक विस्कळीत **झाल्यामुळे त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात येत आहे.** सदर बाब संबंधित कर्मचा–यांच्या निदर्शनास आणून दयावी.

प्रभारी कुलसचिव

मुंबई–४०००३२.

३ डिसेंबर, २०१५

प्रति,

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
स्थानापन्न परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

क्र.इएसटी/आयसीसी/२०१५–१६/१५ /२०१५

३ डिसेंबर, २०१५

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
२. संचालक, जमनालाल बजाज शिक्षण संस्था,
३. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
४. संचालक, शारिरीक शिक्षण आणि क्रिडा,
५. संचालक, आजिवन शिक्षण आणि विस्तार विभाग,
६. प्रभारी, संचालक दूर व मुक्त अध्यायन शिक्षण संस्था,
७. संचालक, युजीसी हयुमन रिसोर्स डेवलपमेन्ट सेंटर,
८. प्रभारी संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था
९. संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ,
१०. संचालक, संगणक केंद्र, परीक्षा भवन,
११. संचालक, अल्केश दिनेश मोदी अर्थशास्त्र व व्यवस्थापन अभ्यास संस्था,
१२. संचालक, प्रशासकीय प्रगती अकादमी, विद्यानगरी,
१३. संचालक, रंगभूमी कला विभाग, विद्यानगरी,
१४. प्राध्यापक, गुरुदेव टागोर तौलनिक साहित्य अध्यासन,
१५. पीठासीन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण,
१६. मानद विधी सल्लागार,
१७. उप–प्रादेशिक सेवायोजन अधिकारी, विद्यापीठ सेवायोजन आणि मार्गदर्शन केंद्र,
१८. मानद समन्वयक, विद्यापीठ संगणीकरण केंद्र,
१९. समन्वयक, लोककला अकादमी, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई–४०००२०.

Received on
18/12/2015
Patil
UCC

२/–